# बृहन्मुंबई महानगरपालिका

(सहाय्यक अभियंता (परि.) एच/पूर्व विभाग)
क्र सआएच/पूर्व/०१२२२१/ स.अ (परी.) दि.२०.०८.२४

## <u>स्वारस्य अभिव्यक्ती</u>

एच/पूर्व विभागातील, वांद्रे (पूर्व) कलानगर उड्डानपुलाखालील घनकचरा (दक्षिण दिशा) व्यवस्थापन विभाग मनपा शौचालयाकरीता सेप्टिक टँक चे बांधकाम करण्याबाबत या कामाकरीता म.न.पा. तोडकाम तालिकेवरील अधिकृत तोडकाम कंत्राटदार यांच्याकडून अर्ज मागवित आहे.

म.न.पा. अधिकृत कंत्राटदार यांनी या बाबतचा तपशील, अर्ज एच/पुर्व विभाग कार्यालयातील मुख्य लिपिक (व्यय) 'एच/पुर्व' विभाग यांच्याकडे संपर्क साधावा. सर्व अर्जदारांकडून अर्जाचा नमुना हा रु. 320/- + 18% टक्के GST कर व इसारा अनामत रक्कम रू. 6000/- यशस्वी कंत्राटदाराकडून स्वतंत्रपणे भरून घेण्यात येईल.

म.न.पा. अधिकृत कंत्राटदारांचे अर्ज जमा करण्याची मुदत ही दि. २२.०८.2024 रोजी दुपारी 03 वाजेपर्यंत आहे. अर्ज जमा करताना सोबत म.न.पा. अधिकृत कंत्राटदारांचे मुळ कागदपत्रे सादर करणे गरजेचे आहे. अर्धवट तसेच चुकीचे भरलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत. याची कृपया नोंद घ्यावी. तसेच अर्ज सादर करण्याच्या अंतिम वेळेनंतर म्हणजेच दि २२.०८.2024 रोजी दुपारी 04:00 नंतर अर्ज स्विकारले जाणार नाहीत.

तसेच सदरची सोडत ही दिनांक २२.०८.2024 रोजी दुपारी 05:00 नंतर सहाय्यक अभियंता (परि.) एच/पूर्व विभाग यांच्या दालनात घेण्यात येईल. तसेच सदर कामाकरीता एक स्वतंत्र म.न.पा. अधिकृत कंत्राटदार प्रतिक्षा यादीमध्ये घेण्यात येतील.

सदर सोडती करिता सर्व पात्र म.न.पा अधिकृत कंत्राटदार उपस्थित राहणे अनिवार्य आहे. याची कृपया नोंद घ्यावी. कोणत्याही म.न.पा. अधिकृत कंत्राटदाराचे एक पेक्षा जास्त पदाधिकारी यांना सहाय्यक अभियंता(परि.) एच/पूर्व विभाग यांच्या दालनात प्रवेश देण्यात येणार नाही. याची कृपया नोंद घ्यावी.

**स्वारस्य अभिव्यक्ती** स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार मा. सहाय्यक आयुक्त ' एच/पूर्व' विभाग यांनी राखुन ठेवलेला आहे. अट असलेली **स्वारस्य अभिव्यक्ती** स्विकारली जाणार नाही.

**सहाय्यक अभियंता (परि.) एच/पूर्व विभाग**